मंगळवार दि.१३ ऑगस्ट२०२४
किंमत २ रुपये | महाराष्ट्र
मराठी दैनिक
वर्ष : ०१ अंक : ३४५
टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | www. lokneta.com

### उद्योगातील नोकऱ्यांमध्ये स्थानिकांना प्राधान्य

# प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा मोबदला लवकरात लवकर दिला जाईल; उद्योगमंत्री उदय सामंत यांची ग्वाही

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

उद्योगांमध्ये स्थानिकांना नोकरीत प्राधान्य देण्याची शासनाची भुमिका आहेच. आहे त्या शैक्षणिक पात्रतेनुसार नोकरी दिली जाईल शिवाय आवश्यक कुशल मनुष्यबळासाठी कंपनीमार्फत कौशल्य प्रशिक्षण देऊन स्थानिकांना नोकरीत सामावून घेतले जाईल,असे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी आज सांगितले. जिल्ह्यातील बिडकीन एमआयडीसी साठी जमिनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा आर्थिक मोबदला देण्यासंदर्भात लवकरात लवकर निर्णय घेऊ, ही सगळी प्रकरणे १७ रोजी मंत्रालयात पाठवावी, असे निर्देशही त्यांनी यंत्रणांना दिले.

बिडकीन औद्योगिक प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नासंदर्भात आज उद्योग मंत्री सामंत यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन समिती सभागृहात बैठक आयोजित करण्यात आली. गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खासदार संदिपान भुमरे, अर्जून खोतकर, प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, एमआयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मलिकनेर, सहा. मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, अपर जिल्हाधिकारी डॉ. अरविंद लोखंडे, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे प्रादेशिक अधिकारी चेतन गिरासे तसेच बिडकीन सरपंच व प्रकल्पग्रस्त शेतकरी आदी उपस्थित होते.



सामंत यांनी निर्देश दिले की, जमिनी संपादित झालेल्या शेतकऱ्यांपैकी वर्ग २ जमिनीचा मोबदला ७० टक्के देण्यात आला आहे. उर्वरित मोबदला न दिलेल्या २२५ प्रकरणांपैकी ७५ प्रकरणात मोबदला देण्यात आला आहे. शिल्लक १५० प्रकरणे संकलित करुन जिल्हा व विभागस्तरावरील मान्यता घेऊन (दि.१७) रोजी शासनाकडे पाठवावे. शासनस्तरावरून लवकरात लवकर निर्णय होऊन शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत कार्यवाही होईल,अशी ग्वाही सामंत यांनी दिली. त्याचप्रमाणे वृक्ष, विहीर मोबदला देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या अहवालानुसार ११ कोटी २६ लक्ष रुपयांचा निधी वर्ग केला जाईल. शेतकऱ्यांना भुसंपादन प्रमाणपत्र देण्यात यावे,असे निर्देशही सामंत यांनी दिले.सामंत म्हणाले की, शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी दिल्या म्हणून तेथे इतक्या मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक येऊ शकली. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्याकडे शासनाची भुमिका आहे.याच शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना शैक्षणित पात्रतेप्रमाणे नोकरी देण्यास प्राधान्य असेल. शिवाय तशी शैक्षणिक पात्रता नसली तरी उद्योग त्यांना लागणाऱ्या कौशल्याचे प्रशिक्षण देतील आणि त्या उमेदवारांना नोकरीत सामावून घेतले जाईल,असेही सामंत यांनी स्पष्ट केले. बिडकीन येथे एक सभागृह बांधणे, औद्योगिक वसाहतीच्या सिमेवर असणाऱ्या शेतकऱ्यांना शेतात येण्या जाण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही अशा पद्धतीने रचना करणे, कौशल्य प्रशिक्षणासाठी कन्व्हेंशन सेंटर इ. आश्वासनेही सामंत यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिले.

# स्थानिक उमेदवारालाच उमेदवारी द्यावी शिवसेना भगवा सप्ताह मेळाव्यात उमटला सूर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार | विनायक कुटे**

लोणार ११ मेहकर लोणार विधासभेला स्थानिक उमेदवारालाच उमेदवारी मिळावी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या भगवा सप्ताह निमित्त मेळाव्यात पदाधिकाऱ्यांचा उमटला सुर शिवसेना भवन येथे भगवा सप्ताह निमित्त जिल्हा संघटक डॉ. गोपाल बछिरे आयोजित शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक यांच्या मेळाव्यात कार्यक्रमाचे अध्यक्ष विजयभाऊ मोरे कृ.उ.बा.स. यांनी आपल्या भाषणात विद्यमान आमदारावर कडाडून टीका केली भाड्याच्या घरात राहणारा आज चारशे कोटीचा मालक झाला आहे गुत्तेदार व सर्वसामान्यांचे मुंडके मोडून हे मोठे झाले आहे, त्याच बरोबर अशात मुंबई पुणे



वाल्याचे नाव उमेदवारीसाठी तबक्या आवाजाने ऐकायला येत आहेत परंतु आपल्याला आपल्या मतदारसंघातील निष्ठावंत शिवसैनिकालाच तिकिट देण्याविषयीचा आग्रह धरून त्यास निवडून आणण्याचे प्रण करणे आहे असे ते म्हणाले, प्रमुख उपस्थित भाषणात शहर प्रमुख गजानन जाधव, ज्येष्ठ शिवसैनिक सुदन अंभोरे, तालुका उपप्रमुख परमेश्वर दहातोंडे यांनीही मेळाव्यात मार्गदर्शन करून मेहकर विधानसभा मतदार संघातील निष्ठावंत व गद्दारीनंतर संघटन ताकतीने पुनरबांधणी करणाऱ्या गोपालभाऊ बछिरे यांनाच उमेदवारी देण्यात यावी आयात केलेला उमेदवार शिवसैनिक मान्य करणार नाही, ही मागणी पक्षप्रमुखाकडे करूत व पक्षप्रमुख मान्य करतील हा विश्वास दर्शवण्यात आला, या मेळाव्यास, महाविकास आघाडीचे ज्ञानेश्वर चिबडे मामा, शिवसेनेचे तालुका उपप्रमुख श्रीकांत नागरे शहर उपप्रमुख लूकमान कुरेशी, शहर संघटक तानाजी मापारी, विभाग प्रमुख राजूभाऊ बुधवत, अल्पसंख्यांक शहर प्रमुख इकबाल कुरेशी, युवा तालुकाउपप्रमुख अमोल सुटे, महिला उपजिल्हा संघटिका संजीवनी वाघ, तालुका संघटिका पार्वतीताई सुटे, शहर संघटिका शालिनीताई मोरे, तानाजी अंभोरे अशोक सरदार आदींची मंचकावर उपस्थिती होती या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युवासेना तालुकाप्रमुख जीवन घायाळ यांनी केले तर आभार युवासेना शहर प्रमुख श्रीकांत मादनकर यांनी मानले.

### स्वाधार योजनेची दोन वर्षाची

# पुर्ण रक्कम तात्काळ जमा करा इंद्रजीत डुमणे गागलेगावकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली | गौतम गावंडे**

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची ई.स २०२२-२३ व २०२३-२४ या दोन वर्षाची रक्कम अजुनही पात्र विद्यार्थांच्या बँक खात्यात जमा झालेली नाही त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थांना अनेक आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे.गावखेड्यातील गोरगरीब विद्यार्थांना शिक्षणासाठी जिल्हाच्या ठिकाणी राहुन शिक्षण घेता यावे यासाठी ही योजना सुरु करण्यात आली.पण गेल्या दोन वर्षापासुन या योजनेची रक्कम अजुनही त्यांच्या बँक खात्यात



जमा करण्यात आलेली नाही.त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थांना अनेक प्रकारच्या आर्थिक संकटांचा सामना करावा लागत आहे इतर योजना राबवण्यासाठी शासनाकडे निधी आहे पण मागासवर्गीय विद्यार्थांच्या शिष्यवृती द्यायलाच शासनाकडे निधी नाही का?असा प्रश्न विद्यार्थांकडुन होत आहे. तेव्हा या विषयावर तात्काळ लक्ष देवुन दोनही वर्षाची पुर्ण रक्कम तात्काळ विद्यार्थांच्या बँक खात्यात जमा करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते इंद्रजीत डुमणे गागलेगावकर यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्याकडे ईमेल द्वारे निवेदन पाठवुन केली.

# सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल श्री.वाघमारे यांचा क्रांतीकारी शिक्षक संघटने तर्फे सत्कार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**

बीड शहरापासून जवळच असलेले पाली गावातील श्री.भाऊसाहेब राऊसाहेब वाघमारे हे इंग्रजी विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण झाले. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. वाघमारे सर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई अंतर्गत समग्र शिक्षा अभियान गट साधन केंद्र केज येथे विषय साधन व्यक्ती म्हणून कार्यरत आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढसाठी काम करत असताना अभ्यासात सातत्य ठेवून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची सहाय्यक प्राध्यापक पात्रता सेट परीक्षा उत्तीर्ण झाले असल्याने



त्यांचा क्रांतीकारी शिक्षक संघटने तर्फे सत्कार करण्यात आला त्या वेळी संघटनेचे संस्थापक सचिव श्री.शाहेद कादरी सर, श्री.अजीज राजा सर व श्री.जावेद खुर्शिद सर उपस्थित होते.

# धानोरा महाविद्यालयाचा विद्यार्थी बनला पोलीस महाविद्यालयाच्या वतीने केला सन्मान

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

तालुक्यातील धानोरा येथील कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बी एस्सी शाखेच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेला व उंदरखेड येथील अजिंक्य वामन याची नुकतीच पोलीस दलात पोलीस शिपाई म्हणून निवड झाली आहे. त्याबद्दल अजिंक्य वामन याचा महाविद्यालयाच्या वतीने सोमवार दिनांक १२ ऑगस्ट रोजी शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सर्वसामान्य शेतकरी कुटंबात जन्मलेला अजिंक्य हा शालेय जीवनापासून हुशार होता आणि प्रयत्नांच्या परिकष्ठाने त्याला अखेर छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या पोलीस भरतीमध्ये त्याची पोलीस शिपाई म्हणून निवड झाली. या निवडीबद्दल त्याचा महाविद्यालयाच्या वतीने प्राचार्य डॉ कैलास वायभासे, प्राध्यापक निसार शेख,प्राध्यापक विवेक महाजन,डॉ संजय झांजे, प्राध्यापिका अंजना गिरी, प्राध्यापक आतेश बनसोडे, प्राध्यापक सतीश तागड, प्राध्यापक ज्ञानदेव बोडखे, प्राध्यापक आजिनाथ गिलचे,डॉ. रमेश खिळदकर,प्राध्यापिका शेख शबाना,प्राध्यापिका रत्नमाला, प्राध्यापक अजिंक्य विधाते, सोमनाथ गिलचे,प्रल्हाद खोटे, गंजुरे आदींनी अजिंक्य वामन याचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या.



## झाडे लावा झाडे जगवा



## चारोळी

ओळखीची माणसंही कधी कधी
अनोळखी वाटायला लागतात
विचारांचे गुंता सुटत नाही
तेंव्हा मार्ग वेगळे निघतात.

रंजना सानप
मायणी (सातारा)

# हद्दपार आरोपीस पाटोदा पोलिसांनी घेतले शिताफीने ताब्यात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा | प्रतिनिधी**

दिनांक-१२/०८/२०२४ रोजी ११:०० वाजता सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, बीड जिल्ह्यातुन तडीपार ईसम नामे निलेश उत्तम अडागळे रा.महासांगवी ता.पाटोदा जि.बीड हा राज महंमद चौक पाटोदा येथे येणार आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.अनमोल केदार यांनी सदरची माहिती पोह/१२४० संतोष काकडे, पोना/१८१३ उद्धव गडकर, पोशि/४७२ रियाज पठाण, पो शि/१८७४ संजय पवार यांना समक्ष दालनात बोलावून सदरची माहिती सांगितली, त्या वर लागलीच नमुद पोलीस पथक खाजगी गणवेशात हजरत राज महंमद चौकातील तारा पान सेंटर येथे सापळा लाऊन थांबले असता, सदरील हद्दपार ईसम नामे निलेश उत्तम अडागळे रा. महासांगवी ता.पाटोदा, जि. बीड हा वेशभूषा बदलून सहज रित्या ओळखता येणार नाही अश्या रीतीने तेथे आला असता पोलीस पथकाने त्यास शिताफीने ताब्यात घेतले. त्या ईसमा विरुध्द पोलीस ठाणे पाटोदा येथे गुरन. ११२/२०२१ कलम ३९४, ५०४, ५०६ भादंवि, गुरन. ५२/२०२३ कलम ३९४, ४२७, ५०४, ३४ भादंवि. प्रमाणे गुन्हे दाखल असल्याने त्यास मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे आदेश जा.क्र.२०२३/एम एजी/हद्दपार/सीआर/पी-०२ २३३८ उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, पाटोदा दिनांक-२८/०३/२०२४ अन्वये, बीड जिल्ह्यातुन एक वर्षासाठी हद्दपार करण्यात आले होते. त्यास दिनांक-२१/०६/२०२४ रोजी पोलीस ठाणे पाटोदा ठाणे दैनंदिनी क्र.१२ वेळ-१४:२३



अन्वये वर नमुद आदेशाची नोटीस तामिल करण्यात येवुन त्याचा जबाब नोंदविण्यात येवुन नमुद जबाबामध्ये त्याने त्याचे एक वर्षाचे तडीपार कालावधी मध्ये त्याचे नातेवाईक नामे शिवाजी महादेव चव्हाण रा.पारगाव ता.वाशी जि.धाराशिव (उस्मानाबाद) यांचे कडे राहणार असले बाबत सांगितले होते. नमुद ईसम यास तो बीड जिल्ह्यातून तडीपार असलेने त्याने पोलीस ठाणे पाटोदा हद्दीत प्रवेश करण्यासाठी मा.उपविभागीय अधिकारी पाटोदा तसेच वरीष्ठ कार्यालयाची पुर्व परवानगी घेतली होती काय किवा कसे या बाबत विचारपुस केली असता त्याने कोणत्याही प्रकारची पुर्व परवानगी घेतली नाही असे सांगितले. तरी ईसम नामे निलेश उत्तम अडागळे रा.महासांगवी ता. पाटोदा, जि.बीड हा मा. उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे वर नमुद आदेशान्वये एक वर्षासाठी बीड जिल्ह्यातुन तडीपार असताना, मा.उपविभागीय अधिकारी पाटोदा यांचे आदेशाचे उल्लंघन करुन विना परवाना बेकायदेशीररीत्या पोलीस ठाणे पाटोदा, जि.बीड हद्दीमध्ये प्रवेश केला म्हणुन त्याचे विरुध्द कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा १९५१ प्रमाणे पोलीस अंमलदार संजय पवार यांचे फिर्यादी वरून कायदेशीर गुन्हा दाखल करून सदर गुन्ह्याचा तपास पोलीस नाईक उद्धव गडकर यांच्या कडे दिल्याने त्यांनी त्यास मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी पाटोदा यांचे न्यायालयात हजर केले.

# जिल्हाप्रमुख ए.जे बोराडे यांना परतुर मंठा विधानसभेची उमेदवारी द्यावी

## मतदारसंघातील कार्यकर्त्यांची पक्षश्रेष्ठींकडे आक्रमक मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांना उमेदवारी द्यावी अशी आक्रमक मागणी केली. उबाठा शिवसेनेच्या जालना जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघातील इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती जालना येथील शिवसेना भवनात शनिवार ता. ११ रोजी घेण्यात आल्या. यावेळी जालना - संभाजीनगर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, शिवसेना नेते मा. खासदार चंद्रकांत खैरे, माजी आमदार शिवाजीराव चोथे, संतोष सांबरे, जिल्हाप्रमुख भास्कर आंबेकर, जिल्हाप्रमुख ए. जे. बोराडे, हिकमत उढाण, मनीष श्रीवास्तव, रमेश गव्हाड, अंकुशराव अवचार यांची प्रमुख उपस्थिती होती. परतुर - मंठा विधानसभा मतदारसंघातील शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परतूर - मंठा विधानसभा मतदारसंघातून जिल्हाप्रमुख





तथा बाजार समितीचे सभापती ए.जे.बोराडे यांना उमेदवारी द्यावी अशी आग्रहाची मागणी केली. जालना मतदारसंघातून भास्करराव आंबेकर, बदनापूर मतदारसंघातून माजी आमदार संतोष सांबरे, भोकरदन मतदारसंघातून मनीष श्रीवास्तव आणि रमेश गव्हाड, तर घनसावंगी मतदारसंघातून हिकमत उढाण यांनी उमेदवारीची मागणी केली आहे. ए जे बोराडे हे मागील तीस वर्षापासून शिवसेनेशी एकनिष्ठ असून शिवसेना उपतालुकाप्रमुख, तालुकाप्रमुख, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद सदस्य, जिल्हा परिषद आरोग्य व शिक्षण सभापती, जिल्हा नियोजन समिती सदस्य आदी पदावर कार्य केले असून आजही मंठा बाजार समितीचे सभापती म्हणून सर्वसामान्य लोकांना न्याय मिळवून देतात. मंठा नगरपंचायत सह पंचायत समिती, जिल्हा परिषद तसेच अनेक ग्रामपंचायती व सोसायटी शिवसेनेच्या ताब्यात आहेत. सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रामध्ये त्यांनी भरीव असे कार्य केले आहे. शिवसेनाप्रमुख स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली परतुर - मंठा - नेर -सेवली भागामध्ये शिवसेनेचे त्यांनी प्रचंड जाळे निर्माण केले आहे. त्यांना पक्षाने उमेदवारी दिल्यास त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी मुलाखतीदरम्यान केला.

# रॅगिंग ऐवजी शैक्षणिक करिअरकडे लक्ष द्या-कैलास भारती

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मंठा । प्रतिनिधी**

शालेय शिक्षण संपल्यानंतर उच्च शिक्षणासाठी ग्रामीण भागातून अनेक विद्यार्थी शहरात येतात अशा विद्यार्थ्यांना वरिष्ठ विद्यार्थ्याकडून काही ठिकाणी त्रास देण्याच्या घटना घडतात. या विरोधात शासनाने कठोर कायदा केल्यामुळे अशा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य पणाला लागू शकते म्हणून रॅगिंग सारख्या प्रकाराऐवजी आपल्या शैक्षणिक करिअरकडे लक्ष द्यावे असे आवाहन सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती यांनी केले. ते स्वामी विवेकानंद महाविद्यालयात आयोजित अँटी रँगिंग सप्ताहाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते .



डॉ . बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर आणि स्वामी विवेकानंद महाविद्यालय मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात अँटी रँगिंग सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य माणिकराव थिटे हे होते तर व्यासपीठावर उप प्राचार्य संभाजीराव तिडके, उपप्राचार्य सुधाकर जाधव, उपप्राचार्य सदाशिव कमळकर, डॉ. रानबा आलटे, डॉ. दत्तात्रय गिरी, डॉ. दक्षता देशमुख इत्यादीची उपस्थिती होती.प्रारंभी आज राष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन प्रमुख पाहुण्याचे शाल व पुष्पहार देऊन स्वागत करण्यात आले .कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. डॉ. आर. एन. आल्टे यांनी करून सदरील सप्ताहाचे महाविद्यालयात आयोजन करण्यामागची भूमिका स्पष्ट केली. यावेळी उप प्राचार्य संभाजी तिडके व डॉ. सदाशिव कमळकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कैलास भारती म्हणाले की, रॅगिंग ही एक मानसिक विकृती असून तिच्या माध्यमातून शारीरिक व मानसिक त्रास दिला जातो. महाविद्यालयात स्थापन केलेल्या कमिटीने सतत दक्ष राहून विद्यार्थ्यांना कुठल्याही प्रकारे त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी . बहुतांशी ही समस्या मोठ्या शहरातील व्यावसायिक कोर्स असलेल्या महाविद्यालयापूर्ती सीमीत असून काही गैरप्रकार घडल्यास ११२ नंबर वर डायल करून माहिती दिल्यास पोलीस तात्काळ कारवाई करतील . विद्यार्थ्यांनी आपल्या आई वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी आपल्या ध्येयावर पूर्ण लक्ष केंद्रित करावे. रॅगिंग विरोधी कायद्यात काही कलमे एवढी कठोर आहेत की त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन उद्ध्वस्त होऊ शकते. विद्यार्थ्यांनी आभासी सोशल मीडियापासून दूर राहून वास्तवात जगावे असे आवाहनही श्री भारती यांनी केले. शेवटी अध्यक्षीय समारोप प्राचार्य माणिकराव थिटे यांनी तर आभार प्रदर्शन डॉं.जितेंद्र जगताप यांनी केले.

# महाराष्ट्र नाभिक महामंडळ शहराध्यक्षपदी अक्षय जाधव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

नाभिक समाजासाठी अग्रेसर असणारे महाराष्ट्रात एक चांगल्या प्रकारचे समाजासाठी चळवळ उभा करून समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारी महाराष्ट्र नाभिक महामंडळ या संघटनेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात मोलाचे काम करत असताना बीड जिल्ह्यातही या संघटनेचे मजबूत पाय रोवल्या गेले आहेत आणि या संघटनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यात सर्व समाजातील युवकासाठी ज्येष्ठ साठी नाभिक समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात या संघटनेचे जाळ पसरण्यात येत आहे. बीड शहराची जबाबदारी अक्षय जाधव यांच्या खांद्यावर देऊन या शहरातील नाभिक बांधवांसाठी युवा कार्यकर्ता म्हणून व त्यांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी अक्षय जाधव यांनी जबाबदारी स्वीकारली आहे. येणाऱ्या काळात प्रत्येक समाजाच्या घटकापर्यंत पोहोचून ती जबाबदारी मी पार पाडून नवयुवकांना सोबत घेऊन शैक्षणिक, सामाजिक, व्यवसाय. विषयी उपक्रमात



सहभाग घेऊन त्यांच्या अडीअडचणी सोडण्याचा प्रयत्न करणार आहे. असेही जबाबदारी स्वीकारल्यावर अक्षय जाधव यांनी आपल्या मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमात अक्षय जाधव यांना जिल्हाध्यक्ष विशाल वाघमारे यांच्या हस्ते शहराध्यक्ष पदाचे निवड पत्र देन्यात आले,यावेळी जन शिक्षण संस्थेचे संचालक गंगाधर देशमुख सर दै. लोकप्रभा चे उपसंपादक नितीन क्षीरसागर चालक-मालक संघटनेचे सुनील दोडके, मंगेश काळे यांच्या हस्ते सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या त्यावेळी नाभिक समाजातील आकाश सपकाळ, गणेश कापसे, दिलीप जगताप, बदाम आतकरे, विक्रम राऊत, सुभाष इप्पळकर, गणेश काळे, इत्यादी..बंधू भगिनी व कार्यकर्ते उपस्थित होते.



बीड जिल्ह्याचे नुतन जिल्हा पोलिस अधीक्षक अविनाशजी बारगळ साहेब यांनी पदभार स्वीकारला असता त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांना जुनेद भैय्या पठाण मित्र परिवार पाटोदा यांच्या वतीने शुभेच्छा देताना..(छाया-लोकनेता न्युज नेटवर्क पाटोदा.)

# नूतन सरपंच रावसाहेब अनुसे यांच्या कामाच्या धडाक्या मुळे कमलापूर ग्रामपंचायतच्या थकित कर वसुलीला वेग

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सांगोला । प्रतिनिधी**

कमलापूर ग्रामपंचायतचे नूतन सरपंच रावसाहेब अनुसे व नूतन ग्रामसेवक सरगर भाऊसाहेब यांच्या कामाच्या झपाट्यामुळे कमलापूर ग्रामपंचायतीचे अंतर्गत अनेक वर्षाची प्रलंबित पाणीपट्टी, घरपट्टी,दिवाबत्ती कर, वसुली थकीत आहे. परंतु नूतन सरपंच आणि ग्राम पंचायतीचे नूतन ग्रामसेवक यांच्या कामाच्या झपाट्यामुळे प्रत्येक वाडी वस्तीवरील लोक घरोघरी वसुलीचे मोहीम हाती घेतल्यामुळे लोकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या करापोटी



लोकांना ज्या नागरिकांनी सर्व कर भरलेला आहे त्यांना आगामी काळात कमलापूर ग्रामपंचायतच्या वतीने मोफत दळण देण्यात येणार आहे. तसेच इतरही भौतिक सुविधा देण्यासाठी कटिबद्ध आहेत. जिथे जिथे दिवाबत्तीची सोय नाही तिथे तिथे दिवाबत्ती देणे, जिथे नळ कनेक्शन नाही तिथे नळ कनेक्शनची सुविधा करणे. स्वच्छ आणि मुबलक पाणी देणे, इत्यादी उपक्रम आगामी काळात घेण्यात येणार आहेत. सदर वसुली मोहिमेसाठी या गावचे नेते बाबुराव बंडगर यांच्या मार्गदर्शनाखाली सरपंच रावसाहेब अनुसे, उपसरपंच नितीन काळे, कर्तव्यदक्ष ग्रामसेवक सरगर भाऊसाहेब, लिपिक श्रीकृष्ण ढोले, आयटी लिपिक रामदास मेहेत्रे, पाणीपुरवठा शिपाई राहुल ढोले, रामभाऊ ढोले, सत्यवान बंडगर, गोडसे, विक्रांत गोडसे, कमलापूर ग्रामपंचायतच्या थकीत वसुलीसाठी तत्पर आहे.

# धर्माबाद तालुक्यातील विविध मागण्या संदर्भामध्ये १४ ऑगस्ट रोजी तहसील कार्यालय धर्माबाद येथे आमरण उपोषण करणार- शेतकरी माधवराव माळगे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**

धर्माबाद तालुका नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी विविध सरकारी यंत्रणेच्या गलथान कारभारामुळे त्रस्त आहे, त्यात धर्माबाद तालुक्यातील शेतकरी अलिप्त राहतील तर कसे? शासन दरबारी २०१९ पासून फेरफार केलेल्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा लाभ मिळत नाही तसेच वारंवार अतिवृष्टी होऊन देखील बोटावर मोजण्या इतक्या शेतकऱ्यांना पिक विमा मिळाला आहे अशा विविध मागण्यासाठी धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव येथील माधवराव ईरांना माळगे व नागनाथ गंगाधर माळगे १४ ऑगस्ट पासून तहसील कार्यालय धर्माबाद येथे आमरण उपोषण सुरू करणार असल्याचे निवेदन त्यांनी तहसील कार्यालय उपनिबंधक कार्यालय पोलीस प्रशासन यांना दिले आहेत. सन २०२२ - २०२३ ह्या वर्षात रब्बी हंगामातील पिके अतिवृष्टीने धोक्यात आली होती, पिकांचे मोठे नुकसान होऊन



उत्पादनात देखील घट झाली होती, त्यातच तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांकडे अँड्रॉइड फोन तर सोडाच पण साधा मोबाईल देखील नसल्याने तक्रार करावी तर कुठे ह्यामुळे अनेकांनी तक्रार केली नसल्याने त्यांचे पिक नुकसान होऊन फटका बसला आहे. त्याकरिता ज्या शेतकऱ्यांनी पिक विमा भरला अश्याना सरसकट विमा देण्यात यावा. सन २०१९ पासून ज्या शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी खरेदी केली आहे किंवा कुटुंबामध्ये वाटणी केली आहे, अश्याना अजून देखील पिएम किसान योजनेचा लाभ मिळत नाही, त्यांना लाभ देण्यात यावा. बँकेचे कर्ज काढून मागील दोन वर्षांपासून शेतकरी अतिवृष्टीने त्रस्त असून शेतात टाकलेले पैसेच कसेबसे त्यांनी मोठ्या कष्टाने काढले आहेत, त्यावर कुटुंबाची गुजरान करत असून त्यांचे पिक कर्ज राज्य सरकारने माफ करावे. ज्या शेतकऱ्यांनी ह्या पूर्वी कर्ज उचलले होते, व काही कारणाने कर्जधारक शेतकरी मयत झाले आहेत, अश्याचे कर्ज माफ करून त्यांच्या वारसांना नव्याने कर्ज देण्यात सर्वच बँका चालढकल करत असून मयत शेतकऱ्यांच्या वारसांना कर्ज देण्यात यावेत. तसेच ज्या शेतकऱ्यांचे कर्ज थकीत असल्याने संबंधित बँकानी खाते होल्ड केले असून ते त्वरित काढून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा वरील मागण्या ह्या एका तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांची ही कहाणी असून शेतकऱ्यांच्या सर्वसामान्य हक्कासाठी धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव येथील शेतकरी माधवराव माळगे व नागनाथ माळगे हे आमरण उपोषण सुरु करणार आहेत. जो पर्यंत वरील मागण्या मान्य होणार नाहीत तो पर्यंत आमरण उपोषण सुरूच राहणार असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहेत.

# मारोतराव कवळे गुरूजी मुळे आमच्यात आमुलाग्र बद्दल झाला-केशव सगमोड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | बाजीराव गायकवाड

आम्ही पूर्वीपासून वडीलोपार्जित शेती व्यवसाय करतो.माझ्या कुटूंबात पत्नी, दोन मुल,आईवडील,एक भाऊ आहे.आम्ही एकत्र कुटुंब पध्दतीने राहतो. पूर्वीची शेती जुन्या पध्दतीने करत होतो उत्पन्न म्हणावे तेवढे निघत नव्हते. त्यात कापुस,सोयाबीन, मुग उडिद इतर पिके घेत होतो.म्हणावे तेवढे खर्च केलेले पैसे निघत नव्हते.आमचे कुटूंब आर्थिक बाजुने माघे आले होते उमरी तालुक्यातील शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान विकसित पध्दतीने ऊस लागवड करावे तरच शेतकरी आर्थिक बाजूने सक्षम होईल असे शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरूजी यांच्या बातम्या नेहमी दैनिक लोकनेता पेपर लेख आला होता तो वाचला तेव्हा माझ्या डोक्यात प्रकाश पडला आपण उमरी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतक-यांच्या गाठीभेटी घेऊन माहिती घ्यावे असे मनात आले तेव्हा मी लगेच दुसऱ्या दिवशी
कुदळा,शेलगाव,सिंधी,जामगाव सह भागातील शेतक-यांच्या भेटी घेतल्या सवांद साधला तेव्हा लक्षात आले. एक दोन एकर मध्ये शेतकरी चार ते पाच लाख रुपयांपर्यंत उत्पन्न काढतात मग आपण का करू शकत नाही असे मनात बसले. आपण आता उमरी भागातील कवळे गुरूजींच्या कारखान्याला प्रत्यक्ष भेट घ्यावी व कारखाना पहावे असे मनात आले. लगेच एका ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून कवळे गुरूजी यांचा मोबाईल नंबर घेतला आणी भितभित मिस्कॉल मारलो.लगेच कवळे गुरूजी यांनी तात्काळ फोन करून विचार पुस केले तेव्हा मी मौजे येताळा गावचा कोरडवाहू शेतकरी केशव पोतन्ना सगमोड आहे. मला ऊस लागवड करायचे आहे. तेव्हा कवळे गुरूजी यांनी तुम्ही कुसूमनगर वाघलवाडा साखर कारखान्यांवर या त्यांनी मला बोलवून घेतले तेव्हा कवळे गुरूजींची पहिली ओळख झाली. कवळे गुरूजी यांनी माझ्या प्रथम आर्थिक बाजुची माहिती





घेतली.जेवन विचारले लगेच रेस्ट हाऊसला पाठवून मला जेवन करुन या असे सांगून सोबत त्यांचा माणूस दिले मग चर्चा करू. मी जेवन करुन आलो . नंतर सविस्तर ऊस पिकाबद्दल चर्चा केले. कुसूमनगर साखर कारखान्यातर्फे शेतक-यांना व मला ऊस लागवड कशी करायची ते प्रशिक्षण घेण्यासाठी गेल्या वर्षी जुर्ले २०२३ महिन्यांत पुणे येथील वसंत दादा शुगर इन्स्टिट्यूट कडे प्रशिक्षणाला पाठवले मि प्रशिक्षण घेतले तेव्हा माझ्या लक्षात आले. आल्या आल्या मी कवळे गुरूजीला नतमस्तक झालो.आता मला ऊस लागवड बद्दल बोला मी केव्हा ऊस लागवड करू सांगा मी एकरी शंभर टन ऊस काढेल अशी ठणकाऊन सांगितलो . दुसऱ्या दिवशी कवळे गुरूजींच्या कर्मचाराचा मला फोन आला तुम्ही कुठे आहात या शेताकडे . मी आलोय मला अछेर्य वाटले.माझी शेती आधिका-यांना दाखवून दोन दिवसच झालं लगेच ८६०३२ नावाच्या जातीचे रोपांची गाडी शेतीवरील बांधावर आली.मी चार एकर ऊस लावलो. आता माझा ऊस बघण्या सारखा आहे. वेळोवेळी कारखान्याचे कर्मचारी माझ्या बांधावर येऊन मार्गदर्शन करतात. आता ऊस अकरा महिन्याचा झाला आहे.पंधारा ते विस टिप-यावर ऊस आला. मी येणा-या ऊस तोडणीच्या वेळी एकरी शंभर टन होईल अशी अपेक्षा आहे. शाश्वत पिक हे ऊस आहे.दहा लाखाचा मला ऊस होणार आहे.बस शेतक-यांचा तळमळीचा एकच नेता मारोतराव कवळे गुरुजी या भागात आहेत.जवळ च देव आहे. पण आम्ही देवदर्शनाला जाण्यापेक्षा अर्धातास कवळे गुरूजीची भेट घेऊन ऊस लागवड बद्दल विचार घेतले तर आपले आर्थिक बाजुने सक्षम होईलच घरात लक्ष्मी येईल. दोन चाकी वरून चार चाकी शेतकरी घेईल,एखादा प्लॉट खरेदी करेल, मुलामुलींचे शिक्षण होईल. घरात जर लक्ष्मी नसेल तर वरील गोष्टी आपण काही करु शकत नाही.ज्या कवळे गुरूजीने त्यांच्याकडे कोणतीच सत्ता नसताना तिन कारखाने,२० बँक पतसंस्थेच्या शाखा,गावोगाव दुध डेअरी अनेक उद्योग ऊभारून न्याय देऊ शकतात.यांना जर आपण आमदारीची सत्ता दिले तर नक्कीच धर्माबाद,उमरी, नायगांव तालुक्याचे सोने करतील अशी मी ऊस लागवड शेतकरी सत्य घटना आधारित माहिती दिली आहे.

## आष्टी मतदार संघ भकास करणाऱ्या प्रस्थापित पुढाऱ्यांना जनतेने घरी बसवावे-कैलास दरेकर



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी | अण्णासाहेब साबळे

प्रस्थापित पुढाऱ्यांनी आष्टी मतदार संघ आकाश केल्याचा मनसे शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केला आरोप गेल्या ४० वर्षात एकही मोठा उद्योग आष्टी मतदार संघात उभा राहिला नाही यामुळे मोठ्या प्रमाणात आष्टी मतदार संघात बेरोजगारीचे प्रमाण वाढला आहे, जे उद्योग उभा होते ते बंद पाडण्याचं काम या प्रस्थापितांनी केलं कडा सहकारी साखर कारखाना,अनेक ठिकाणचे दूध संघ,कडा सहकारी साखर कारखान्यामध्ये अंदाजे २००० हजार कुटुंब बेरोजगारीच्या खाईमध्ये फेकले गेले अनेकांचे संसार उध्वस्त झाले गेल्या



४०-४५ वर्षात ज्या कुकडीच्या पाण्याचा राजकारण आष्टी मतदार संघामध्ये केलं गेलं ते कुकडीचे पाणी आजतागायत या मतदारसंघाला मिळाला नाही याचं स्वरूपही कुठल्याही प्रस्थापितांना नाही आष्टी -पाटोदा -शिरूर- कडा यासारख्या शहरांना १९९१ मध्ये रोज पाणीपुरवठा केला जात होता परंतु आज परिस्थिती दहा दहा दिवस या शहरांना पाणी मिळणं कठीण होऊन बसला आहे,आष्टी तालुक्यातील काही भागात रस्त्याचे दुरावस्था अजूनही पाहायला मिळत आहेत त्याला जबाबदार कोण?गावोगावच्या फाट्यावर अनधिकृत दारू विकणारे धाबा संस्कृती फोफावली आहे यामुळे ग्रामीण भागातल्या तरुणांना व्यसनाच्या आहारी लोटण्याचं काम या सत्ताधाऱ्यांनी केल्याचे मनावयास हरकत नाही यामुळे अनेक कुटुंबांना भूमी हीन होवा लागले आहे आरोग्य सुविधांचे दिडोंळे या ठिकाणी निघत आहेत शेतकऱ्यांच्या वैयक्तिक लाभांच्या योजनेसाठी चिरीमिरी घेतल्याशिवाय कुठले अधिकारी काम करत नाहीत शेतकऱ्यांच्या पिकाला या ठिकाणी भाव मिळत नाही दुधाला भाव नाही शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झालेली ही सर्व परिस्थिती या प्रस्थापित पुढाऱ्यांच्या नजरेखाली असताना सुद्धा बघ्याची भूमिका हे सत्ताधारी घेत आहेत यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आष्टी मतदार संघ भकास करणाऱ्या प्रस्थापित पुढाऱ्यांना या सुज्ञ जनतेने घरी बसवावे असा आव्हान मनसे शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी केलं आहे.

### प्रेरकांना थकीत मानधन देऊन शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी

## सचिवा मार्फत मुख्यमंत्री शिंदे यांच्या कडे यज्ञकांत कोल्हे यांनी केली मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

नांदेड | बाजीराव गायकवाड

साक्षर भारत प्रेरकांचे मागील प्रलंबित मानधन तात्काळ देऊन शासकीय सेवेत रुजू करून घेण्याच्या मागणीचे निवेदन प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर यानी नुकतेच मुख्यमंत्र्यांच्या सचिवा मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांना दिले आहे.

राज्यासह मराठवाड्यातील अतिशय जिव्हाळ्याचा प्रश्न असलेल्या १४. हजारांवर प्रेरकांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रेरक संघटनेचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा नांदेड जिल्हाध्यक्ष यज्ञकांत पाटील कोल्हे भायेगावकर यांनी दि.(१२) ऑगस्ट रोजी मुख्यमंत्र्यांचे सचिव बालाजी पाटील खतगावकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर यांना दिले आहे.सदरिल निवेदनात असेही नमूद केले आहे की,२०१२ ते २०१८ सदरील कालावधीत प्रेरकांनी साक्षर भारत



कार्यक्रमाअंतर्गत निरक्षरांना साक्षर करणे,दर सहा महिन्यांनी परिक्षा घेणे, शासनाच्या विविध योजने संदर्भात जनजागृती करणे अशी विविध प्रकारची कामे केली.कोरोना काळात कोरोना योद्धाची भुमिका पार पाडली तरीही ३१ मार्च २०१८ पर्यंतचे सरासरी ५२ महिन्याचे मानधन प्रलंबित राहिले.तद्रंतरही प्रेरकांनी सामाजिक हित लक्षात घेता आपलं समाजपयोगी कार्य चालू ठेवले. सदर बाब लक्षात घेऊन प्रेरकांचे मागील प्रलंबित मानधन तात्काळ देऊन नवभारत साक्षर भारत अभियानात समावेश करून अंशकालीन कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा यांसह विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

तत्पूर्वी अनेक वेळा जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय,प्रौढ प्रशिक्षण संचालक कार्यालय पुणे, नागपूर हिवाळी अधिवेशन, मुंबई मंत्रालय, संसद भवन दिल्ली येथे वारंवार अनेक आंदोलने केली सदर आंदोलनात शिवराज पाटील पवार, प्रभाकर व्यवहारे,शहाजी पाटील शिंदे,पीआर चिखल भोसीकर यासह अनेकांनी नेतृत्व करून मोर्चे काढली तरीही संबंधित राज्य व केंद्र सरकारला जाग आली नसल्याचे यज्ञकांत पाटील कोल्हे भायगावकर माजी प्रदेशाध्यक्ष नांदेड जिल्हाध्यक्ष निवेदनात म्हटले आहे.



अबिनाशजी कुमार (भा.पो.से) नांदेड जिल्हा पोलिस अधीक्षक यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करताना पत्रकार प्रदिप मुगावे पेठवडज व पत्रकार संभाजी वडजे आंबुलगा.(छाया:- बाजीराव गायकवाड)



डोनवाडा येथील विद्यमान सरपंच आ.शयामसुंदर शिंदे यांचे समर्थक भगवान दत्तात्रय घोडके यांचा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षामध्ये काँग्रेस तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून प्रवेश केला यावेळी उपजिल्हाध्यक्ष भास्करराव पाटील जोमेगावकर ,सेवादल तालुका अध्यक्ष उद्धव पाटील ढेपे अनुसूचित जाती जमातीचे तालुकाध्यक्ष मधुकरराव डाखोरे, चेअरमन माधवराव कदम, अल्पसंख्यांक उपाध्यक्ष श्री अकबर शेठ व मित्रपरिवार उपस्थित होते.



महाकाल कावड यात्रेचे लोणार शहरात आगमन प्रस स्वागत करताना नितीन पाटील मित्र मंडळ लोणार

## कंधार तालुक्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत ३६३९४ जणींची नोंदणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

कंधार | धोंडीबा मुंडे

महिलांना मदत,तसेच त्यांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी,आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनातर्फे 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना सुरू करण्यात आली आहे.या योजनेमध्ये कंधार तालुक्यात ३६ हजार ३९४ महिला लाभार्थ्यांची ऑनलाइन नोंदणी केली आहे.गरीब व गरजू महिलांसाठी ही योजना आर्थिकदृष्ट्या फायद्याची ठरणार आहे.

बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालय कंधार येथून 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या अनुषंगाने मिळालेल्या माहितीनुसार शहरांसह तालुक्यांतून या योजनेसाठी दि.१ जुलैपासून अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे.दि.३१ ऑगस्ट ही अंतिम तारीख आहे. अंतिम यादी प्रकाशित झाल्यानंतर योजनेचा १ हजार ५०० रुपयांचा पहिला हप्ता लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा होईल.दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत या योजनेचा लाभ महिलांच्या बँक खात जमा केला जाणार आहे.



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी योजनेचा पहिला टप्पा दि.३१ ऑगस्ट पर्यंत पूर्ण होईल.मात्र त्यानंतर ही योजना निरंतर सुरू असेल.अर्ज उशिरा दाखल झाला तरीही जुलै ऑगस्ट अशा दोन महिन्याचे पैसे महिलांच्या अकाउंटमध्ये जमा होतील,रक्षाबंधनपूर्वी दि.१६,१७ ऑगस्टला महिलांच्या खात्यामध्ये पैसे जमा होतील याची शाश्वती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.सरकारच्या वतीने महिलांच्या उत्थानासाठी विविध योजना आखल्या जात आहेत.शासनाने यामध्ये कोणतीही जाचक अशी अट ठेवली नाही.

**" कंधार तालुक्यांत मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत एकूण ३६ हजार ३९४ अर्ज लाभार्थी कडून दाखल करण्यात आले होते,त्यापैकी ३५ हजार २०७ अर्जाला मंजुरी मिळाली त्यात ४० अर्ज बाद करण्यात आले आहे,११४७ अर्ज फेर सादर करण्यासाठी वापस करण्यात आले आहेत.जिल्हास्तरीय समिती ने मंजूर करण्यात आले आहे.तालुक्यातील जास्तीत जास्त महिलांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपाने केले आहे.**

## भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद महा प्रवेश द्वाराचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या हस्ते भुमीपुजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

उदगीर | सुनिल बस्वराज हावा

उदगीर येथे या भारत देशाचे पहिले शिक्षणमंत्री भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद हे होते. त्यांच्या नावाने प्रवेशव्दार उभारून पुढच्या पिढीला प्रेरणा मिळेल म्हणून गेल्या १५ वर्षापासून प्रलंबित असलेल्या भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या नावाने उभारण्यात येणा-या महा प्रवेशव्दाराचा प्रश्न सोडवला असुन महाराष्ट्रातील एक देखणे प्रवेशव्दार या ठिकाणी उभारले जात आहे. गेल्या ५ वर्षाच्या काळात सर्व समाजघटकांना घेवुन मतदार संघाचा विकास केला. त्यामध्ये उदगीर व जळकोट मतदार संघातील अल्पसंख्यांक बांधवांचे प्रश्न प्राधान्याने आपण सोडवले असल्याचे मत महाराष्ट्र राज्याचे क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर शहरातील जळकोट रोड येथे भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद महा प्रवेशद्वाराच्या भुमिपुजन सोहळया




प्रसंगी बोलत होते. यावेळी मौलाना एजाजजुल हक, मौलाना जाकीर साब, मौलाना नौशाद साब, हफिज मोहीद्दीन, मौलाना युसुफ खासमी, खाजा कमरोद्दीन, समीर शेख, श्याम डावळे, समद शेख, मुजिब खतीबसाब, वसंत पाटील, सय्यद जानीमियाँ, अनिल मुदाळे, फय्याज शेख, सनाउल्ला खान, इमरोज हाशमी, शहेबाज पठाण, श्रीहरी पाटील, नबीलउजमा, मौलाना हकीम, तनवीर ठाणेदार, शफी हाशमी, प्रवीण भोळे, इब्राहिम देवर्जनकर, नजीर हाशमी, इब्राहिम पटेल, मौलाना इस्माईलसाब, जितेंद्र शिंदे, अन्वर पठाण, रऊफ शेख, डॉ.सचिन स्वामी, नवाब पटेल, सायस दराडे, इम्तियाज शेख, माजीद मोमीन, अँड.जहागीरदार, चंद्रशेखर पाटील, हुसनाबानो, वैशाली कांबळे, काजल मिरजगावे, सुनिता तेलंगे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी, आम्ही शिव, शाहु, फुले, आंबेडकरांचे पाईक आहोत. महापुरुषांच्या विचारधारेवर आमची वाटचाल आहे. मुस्लीम समाजाची शिक्षणाने प्रगती करावी म्हणून महायुती सरकारने मार्टी ची स्थापना केली. गेल्या अनेक वर्षापासुनच्या अल्पसंख्यांक बांधवांच्या मागणीला यश आल्याने अल्पसंख्यांक समाज हा मुख्य प्रवाहात येईल. मार्टी योजनेमुळे अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. यामुळे विविध पदावर काम करण्याची संधी त्यांना उपलब्ध होणार असुन आपल्या मतदार संघात अल्पसंख्याक वस्तीगृहाला निधी दिला. शासकीय अध्यापक विद्यालयाच्या समोर मुस्लीम शादीखाना उभारला, मुस्लीम मोहल्यात रस्ते, पाणी, वीज या मुलभुत गरजा पुरवुन त्या - त्या वार्डात सभागृह उभारले, इदगाह मैदानावर संरक्षण भिंत बांधण्यासाठी निधी दिला, क्रबस्तानातील संरक्षण भिंत बांधकामासाठी निधी व विविध मस्जीदला निधी दिला. यावेळी उदगीर शहर परिसरातील समाजबांधव व विविध पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज-प्रा.डॉ.महेंद्र अवघडे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मयूर ढोबळे । ओतूर**



शिवजन्मभूमी, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक, धार्मिक तसेच तिर्थक्षेत्र म्हणून ओळख असणाऱ्या ओतूर येथे दुसरा राज्यस्तरीय श्रावणधारा काव्यमहोत्सव, अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालय, ओतूर येथे आयोजित करण्यात आला होता. नीलपुष्प साहित्य मंडळ ठाणे, संत गाडगे महाराज विचारमंच महाराष्ट्र राज्य, ओतूर, पुणे,आणि वर्ल्ड व्हिजन संस्था, मुंबई यांच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते . श्रावणधारा काव्यसंमेलनाचे अध्यक्षस्थान जेष्ठ कवी राजेश साबळे, ओतूरकर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे आणि राजकवी डॉ. खं. र. माळवे उपस्थित होते. महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वसंत गावडे आणि ओतूरच्या सरपंच प्रा. डॉ. छायाताई तांबे यांची प्रमुख उपस्थिती होती. ओतूर गावचे लोकप्रिय साहित्यिक डॉ. प्रविण डुंबरे यांनी स्वागताध्यक्ष म्हणून भूमिका पार पाडली. मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन व महाराष्ट्र गीताने झाल्यानंतर, अण्णासाहेब वाघीरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी स्वागतगीत सादर केले. त्यानंतर आपल्या प्रास्ताविकातून डॉ. प्रविण डुंबरे यांनी कार्यक्रम आयोजनाची भूमिका स्पष्ट करून पुढील कार्यक्रमाची रूपरेषा सांगीतली. आयोजकांनी मान्यवरांचे स्वागत आणि सत्कार केला. जिल्हा परिषद सदस्य मा. मोहित ढमाले यांनी स्पर्धकांसाठी सन्मान चिन्हांचे आयोजन केले होते. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. महेंद्र अवघडे यांनी आपल्या मनोगतात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे असे म्हटले आहे. डॉ. वसंत गावडे यांनी कविता कशी असावी बद्दल मार्गदर्शन केले .त्यानंतर श्री. राजेश साबळे यांचे सणोत्सव, डॉ. प्रविण डुंबरे यांची अनुक्रमे प्रतिबिंब आणि रिमझिमधारा, डॉ. रोहिणी मदने यांचे हुंकार वेदनेचा आणि माजी मुख्याध्यापक दावल ठिकेकर सर यांचे हिंदी अभिनेते आणि अभिनेत्री अशी एकूण पाच पुस्तके प्रकाशित करण्यात आली . श्रावणधारा काव्यस्पर्धेत सुमारे ७५ कवींनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परिक्षक म्हणून जेष्ठ साहित्यिक सुरेश डुंबरे, संजय गवांदे आणि सरिता कलढोणे यांनी काम पाहिले. परिक्षकांनी सर्व स्पर्धकांना मोलाचे मार्गदर्शन केले. काव्य स्पर्धेचे विजेते अनुक्रमे प्रथम मनोज कुमार सरदार -आंबेगाव, द्वितीय गौतम -वाघमारे संगमनेर, तृतीय- प्रदीप बडदे नवी मुंबई, चतुर्थ- कल्पना देशमुख -नवी मुंबई, पाचवा लीना बाबर साबळे -अंबरनाथ व छाया डुंबरे-ओतूर तसेच उत्तेजनार्थ रामचंद्र भडवडकर- रत्नागिरी व डॉ. राम राऊत -उंब्रज यांना घोषित करण्यात आले.संत गाडगे महाराज विचारमंचच्या वतीने सूर्यकांत शेटकार, अरुण माने, देविदास इंगळे, अर्जुन कांबळे आणि हिराबाई औटी या मान्यवरांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. राजेश साबळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेला लागलेली उतरती कळा आणि उपाययोजना यावर विचार मांडले. सर्व विजयी स्पर्धकांना तसेच सहभागी स्पर्धकांना प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. उपस्थितांमध्ये स्तंभलेखक संजय नलावडे, बॉर्डरलेस पँथर्स परिवाराचे संस्थापक दिपक भाऊ सुकाळे, जुन्नर तालुका मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. गणेश नायकोडी, शांता शेळके प्रतिष्ठान मंचरचे अध्यक्ष दत्ताजी पायमोडे, म.सा. परिषद, राजगुरुनगर शाखेचे अध्यक्ष संतोष गाढवे, वाघिरे कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. नामदेव डोके, डॉ. डी. बी.मते, प्रशांत गायकवाड राजेंद्र सगर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम निवेदन प्रा. नागेश हुलवळे आणि रणजित पवार यांनी केले. महाविद्यालयाची विद्यार्थिनी युवराज्ञी सोनवणे हिने पाहुण्यांच्या स्वागतासाठी सुंदर रांगोळी काढली होती. रणजित पवार यांनी आभार प्रदर्शन केले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराजस्व अभियान-मंडल निहाय विशेष शिबीराचा लाभ घ्यावा-आमदार राहुल कुल

## मंडल निहाय जागेवरच होणार कामांचा निपटारा!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



दौंड तालुक्यातील नागरिकांच्या विविध विभागांशी संबंधित प्रलंबित विषयांसंबंधी महाराजस्व अभियान अंतर्गत मंडल कार्यालय निहाय विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे आमदार राहुल कुल यांचे मध्यवर्ती कार्यालय केडगाव येथून माहीती देण्यात आली आहे. या शिबीरात जागेवरचं नागरीकांच्या कामाचा निपटारा होणार आहे.यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की पुढील तारखेनुसार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

१४/०८/२०२४ - देऊळगाव राजे, रावणगाव - मंडल अधिकारी कार्यालय.

२२/०८/२०२४ - दौंड, पाटस - मंडल अधिकारी कार्यालय.

२९/०८/२०२४ - वरवंड,केडगाव - मंडल अधिकारी कार्यालय.

०५/०९/२०२४ - राहू, यवत - मंडल अधिकारी कार्यालय.

१२/०९/२०२४ - दौंड नगरपरिषद या सर्व

शिबिरामध्ये सहभागी असणारे शासकीय विभाग - पंचायत समिती,दौंड नगरपरिषद,कृषी विभाग, भूमी अभिलेख,वन विभाग,सहायक निबंधक, चडएइ, सर्व महा ई सेवा केंद्र व सेतू सुविधा केंद्रे.

शिबिरातील प्रमुख मिळणाऱ्या सुविधा

१) नवीन मतदार नोंदणी,दुरुस्ती करणे

२) आधार कार्ड नोंदणी,दुरुस्ती, घधउ करणे.

३) नवीन शिधापत्रिका,दुरुस्ती,शिधापत्रिका विभाजन करणे

४) विद्यार्थी रहिवाशी दाखला,कुणबी तसेच इतर सर्व जातीचे दाखले.

५) आयुष्यमान भारत कार्ड वाटप.

६) फेरफार अदालत,वारस नोंद संबंधित प्रलंबित प्रकरणे.

७) संजय गांधी निराधार योजना,श्रावणबाळ योजना तसेच महसूल विभागाशी संबधित विविध योजना राबविणे.

८) विविध विभागांशी संबंधित प्रलंबित अर्जाचा निपटारा होणार आहे.

दौंड तालुक्यातील नागरिकांनी या विशेष शिबिराचा लाभ घ्यावा.

अधिक माहितीसाठी आमदार राहुल कुल यांचे मध्यवर्ती संपर्क कार्यालय फोन नंबर :- ७० ३८ ६६ ७७ ९९ येथे संपर्क साधावा असे अवाहन करण्यात आले आहे.

# परमेश्वर इंगोले यांची राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या पैठण विधानसभा निरीक्षक पदी निवड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**सेनगाव । महादेव हरण**



सेनगांव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथील रहिवासी असलेले राष्ट्रवादी शरद पवार गटाचे महाराष्ट्र प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांची पैठण विधानसभा निरीक्षक पदी निवड झाली असून या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. परमेश्वर इंगोले यांनी पक्षासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल वरिष्ठांनी घेऊन त्यांची पैठण विधानसभेच्या निरीक्षक पदी निवड करण्यात आली. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांच्या आदेशाने परमेश्वर इंगोले यांच्या खांद्यावर पैठण विधानसभा पक्ष निरीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आली. विधानसभेच्या निवडणुका अगदी काही दिवसांवर येऊन ठेपल्या असून या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने आपली कंबर कसली आहे त्या अनुषंगाने विविध पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात येत असून सेनगांव तालुक्यातील जवळा बुद्रुक येथील राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेश युवक सरचिटणीस परमेश्वर इंगोले यांनी पक्षासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन त्यांची पैठण विधानसभा निरीक्षक पदी निवड करण्यात आली असून या निवडीबद्दल त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा व अभिनंदन याचा वर्षाव होत आहे.

# भाळवणी येथील युनियन बँकेचे नूतन शाखाधिकारी बालाजी हारके यांचे स्वागत



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पंढरपूर । प्रतिनिधी**


पंढरपूर तालुक्यातील भाळवणी येथील युनियन बँक ऑफ इंडिया शाखा भाळवणी च्या नूतन शाखाधिकारीपदी बालाजी हारके यांची नेमणूक झाली आहे. त्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने सरपंच रणजीत जाधव यांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी शेतकरी दूध संस्थेचे चेअरमन निहाल शेख,प्रशांत माळवदे,विवेक भोरे ,परेश वाळवणी,अशोक गुरव,बापू वाघमारे उपस्थित होते.

यावेळी सरपंच रणजीत जाधव म्हणाले की येथील , परिसरातील बँकेचे ग्राहक आपणास सर्व ते सहकार्य करतील आणि बँक ग्राहकांचे सर्व प्रश्न चर्चेतून लवकरच मार्गी लागतील. याकरिता ग्रामपंचायतीचे सर्वते सहकार्य केले जाईल असेही जाधव म्हणाले.यावेळी शाखाधिकारी हारके म्हणाले आजपर्यंत बँक ग्राहकांनी जे सहकार्य केले आहे.असेच सहकार्य राहू द्यावे.निश्चितपणानेच खातेदारांचे सर्व प्रश्न सोडवले जातील.

# सूफी संत हजरत सांगडे सुल्तान यांचा ५९० वा उर्स बुधवारपासून

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



हिंदू-मुस्लिमांचे श्रद्धास्थान असलेल्या सूफी संत हजरत सय्यद शेख अली सांगडे सुल्तान मुश्किले आसान रय.अ.यांचा ५९० वा उरूस महोत्सव अनेक वर्षापासून पारंपरिक सद्भावना आणि उत्साहात साजरा करण्यात येणार आहे, अशी माहिती सज्जादा सय्यद शाह अनवारुल्लाह हुसैनी रफाई कादरी यांनी दिली.

सज्जादा सय्यद शाह अनबारुल्लाह हुसैनी म्हणाले की,हिंदू-मुस्लिम यांचे श्रद्धास्थान असलेले प्रेम,शांती आणि बंधूत्व शिकविणारे महान सूफी संत हजरत सय्यद शेख सांगडे सुल्तान मुश्किले आसान र.अ.याचा उरुस दि.१४ ऑगस्ट बुधवार रोजी सायंकाळी ५.३० वाजता संदल मिरवणूक दर्गाह मधून निघेल व रात्री १०.०० वाजता दर्गाह परिसरात सूफी संत यांच्या महान कार्यावर प्रबोधनात्मक कार्यक्रम दि.१५ ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी ७ ते १० वाजेपर्यंत फातेहा का प्रसाद व भोजन करण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी भाविकांना सांगण्यात आले व सायंकाळी चिरागांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून दि.१६ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५.३० वाजता हजरत सय्यद शाह अजीमोद्दीन (शाह धड़क) र.अ. आणि स. शाह मोईनोद्दीन (शाह कडक) र.अ.कंधार यांचा संदल व रात्री प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षी सूफी संत हजरत सय्यद शेख सांगडे सुल्तान मुश्किले आसान त्यांचा ५९० या उरूस महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे,भाविकांनी गर्दी न करता शिस्तीने सूफी संतांचे दर्शन घेतेवेळी अनुचित प्रकार घडू नये याची काळजी घ्यावी असे आवाहन त्यांनी केले.

### जगतुंग तलावापासून भाविकांनी दूर रहावे-हुसैनी

**कंधार शहरातील जगतुंग तलावात पाणीसाठा मोठ्या प्रमाणात असल्याने आपला हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात यावा पण तळ्याकाठच्या जवळ असल्याने भाविकांना कळविण्यात येते की जगतुंग तलावाकडे आपले नातेवाईक मुले बाळ यांना तलावाकडे जाऊ देऊ नये असे सय्यद शाह अनवारुल्लाह हुसैनी रफाई कादरी सज्जादा नशीन व मुतवल्ली दर्गाह हजरत सय्यद शेख सांगडे सुल्तान मुश्किले आसान यांचे वंशज यांनी आवाहन केले आहे.**

# विचारवंतांची जयंती वैचारिक पद्धतीने साजरी करणार-कॉ.महादेव नागरगोजे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पाटोदा । प्रतिनिधी**

ज्यांनी आपले पुर्ण आयुष्य शोषित, पिडीत शेतकऱ्यांसाठी अर्पित केले अश्या थोर विचारवंतांची जयंती आपण दारू पिऊन डिजे च्या तालावर उड्या मारून साजरी करीत असाल तर त्या थोर विचारवंतांना कसे वाटत असेल याचं ही नवतरूणांनी भान ठेवले पाहिजे. लोक शाहीर आण्णाभाऊ साठे यांनी पुर्ण आयुष्य अन्याया विरोधात आपल्या साहित्याच्या माध्यमातून लढा उभा केला व तो यशस्वी केला तर खा.कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांनी शेतकऱ्यांची बाजू घेत त्यांना सर्वात पहिली कर्ज माफी मिळवून दिली अश्या महापुरुषांच्या जयंती त्यांच्या विचारांची पेरणी करणारे कार्यक्रम आयोजित करणारे असावे मात्र सध्याची परिस्थिती पाहता मन व्यतित होत आहे. त्यांच्या विचारांची शिदोरी घेऊन आम्ही कार्यरत राहणार असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे आयोजक कॉ.महादेव नागरगोजे यांनी केले. कॉ.लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व बीड जिल्ह्याचे मा.खा.कॉ. क्रांतीसिंह नाना पाटील यांची संयुक्त जयंती दिनांक- ११ ऑगस्ट-२०२४ रविवार रोजी रेणुका माता मंदिरच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून अखिल भारतीय किसान सभाचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ.राजन क्षिरसागर, भारतीय कम्युनिस्ट पक्ष सचिव मंडळ सदस्य




कॉ.नामदेव चव्हाण, भारतीय शेतकरी कामगार पक्ष युवा नेते भाई मोहन गुंड, प्रा.तांदळे यांची होती. या वेळी विविध शाळेत साहित्यरत्न लोक शाहीर आण्णाभाऊ साठे व कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या कार्यावर वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या होत्या त्या मध्ये प्रत्येकी शाळेतून प्रथम, द्वितीय, तृतीय स्पर्धक निवडण्यात आले होते. त्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रोत्साहनपर रोख बक्षीस वितरण करण्यात आले. या वेळी कॉ.राजन क्षिरसागर यांनी कॉ.क्रांतीसिंह नाना पाटील यांची जन्मभूमी व कर्मभूमी असलेल्या पाटोदा शहरात स्मारक मंजूर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे जाहीर केले तर शेतकऱ्यांवर केंद्र व राज्य सरकार कसे अन्याय करत आहे. या वर भाष्य केले, तसेच भाई मोहन गुंड, प्रा.तांदळे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत महापुरुषांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे पुस्तके मोफत उपलब्ध करून देणार असल्याचे जाहीर केले. या वेळी व्यासपीठावर प्रा.सुशिलाताई मोरोळे, युवा नेते गणेश कवडे, जेष्ठ समाजसेवक एकबाल पेंटर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचालन कु.सुरेखाताई खेडकर यांनी केले. तर भारतीय शेतकरी कामगार पक्षाचे बीड जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904